**CNR No. MHSI01-000658-2019**

# नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. ७४/२०१९ मधील नि. ११, २१ व २२ खालील सामाईक आदेश.

**(मंदाकिनी डिचवलकर – पुनर्वादी वि. सुरेंद्र वालावलकर वगैरे – उत्तरवादी)**

-------------------------

१. पुनर्वादीच्या वारसांनी प्रस्तुतचा अर्ज नि. ११ हा पुनर्वादीचे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेकरीता, अर्ज नि. २१ हा उपशमीतचा आदेश रद्द करणेकरीता आणि अर्ज नि. २२ हा पुनर्वादीचे वारस अभिलेखावर घेणेकामी परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जांचे अवलोकन केले. पुनर्वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतच्या अर्जदारांचे असे कथन आहे की, पुनर्वादी – मंदाकिनी नारायण डिचवलकर यांचा दि. ०५/०३/२०२० रोजी मृत्यू झाला, परंतु कोवीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे ते विहीत कालावधीत सदरहू पुनर्वादीचे वारस अभिलेखावर आणू शकले नाहीत. उत्तरवादी यांनी सदरहू अर्जांकामी म्हणणे दिलेले नाही.

४. अभिलेखावरील मृत्यू प्रमाणपत्रावरुन पुनर्वादीचा मृत्यू दि. ०५/०३/२०२० रोजी झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदरचे अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान संभवत नाही, उलटपक्षी पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन प्रकरण गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करणेत येत आहेत. पुनर्वादीचे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे. उपशमीतचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. पुनर्वादीचे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत.

३. अर्जदारांनी नियमानुसार विहीत मुदतीत आवश्यक पूर्तता करावी आणि पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

(सं. जु. भारुका)

दिनांकः– १३/०१/२०२३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.